**सहपत्र 'अे'**

## (शस्त्र अधिनियम १९५९ मधील कलम-१३)

## नवीन शस्त्र परवाना मिळणेसाठी करावयाच्या अर्जासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे.

१. एक खिडकी येथील नवीन शस्त्र परवाना मिळणेबाबतचा रु. १००/- चा विहीत नमुन्यातील अर्ज.

२. अर्जदाराचा वयाच्या पृष्ठयर्थ पुरावा :- जन्म तारखेचा दाखला/शाळा सोडलेचा दाखला/इयत्ता १० वी पासचे बोर्ड सर्टिफिकेट इत्यादी*.

३. अर्जदार यांनी रु. १००/- चे स्टॅम्प पेपरवर त्यांना कोणत्याही गुन्हयात अटक, शिक्षा झाली नसलेबाबत तसेच कोर्टात त्यांचेविरुध्द खटला प्रस्तावित/प्रलंबित नसलेबाबत नोटरी/मॅजिस्ट्रेट समोर केलेले प्रतिज्ञापत्र.

४. अर्जदाराचे आरोग्य विशेषतः डोळे, कान व मानसिक संतुलन योग्य असल्यासंबंधी वैद्यकीय प्रमाणपत्र.

५. ज्या कारणासाठी शस्त्र परवाना हवा आहे त्या संबंधीचा पुरावा. (अ,ब,क,ड पैंकी एक)

अ) शेतीचे संरक्षण :- चालू वर्षाचा ७/१२ उतारा / ८ अ चा अद्ययावत उतारा*

ब) मालमत्ता संरक्षण :- अर्जदाराचे नांवे असलेल्या मालमत्तेचा तपशिल दर्शविणारे विवरण व त्यानुसार मालमत्तेच्या पावत्या इत्यादी*.

क) राज्य व राष्ट्रीय पातळीवर खेळलेल्या खेळाबाबतचे प्रमाणपत्र.

ड) स्वसंरक्षणार्थ :- अर्जदार यांना खंडणीसाठी किंवा इतर कारणांसाठी जीवे मारण्याची धमकी देण्यात आली आहे किंवा त्यांच्यावर प्रत्यक्ष हल्ला किंवा हल्ल्याचा प्रयत्न झाला असल्यास त्याबाबत पोलीस ठाणेस नोंदविलेल्या प्रथम खबरी अहवालाची (FIR) प्रत.

६. अर्जदार यांच्या व्यवसाय किंवा नोकरी बाबत पुरावे. (अ,ब,पैंकी एक)

अ) व्यवसाय करीत असल्यास कोणता व्यवसाय व त्यासंदर्भातील आवश्यक कागदपत्रे. (व्यवसाय रजिस्ट्रेशन सर्टिफिकेट/शॉप ॲक्ट लायसन्स/व्यवसायाचे स्वरुप दर्शविणारे इतर कागदपत्रे) *

ब) नोकरी करीत असल्यास ते धारण करीत असलेले पद, खाते, वगैरे दर्शविणारे संबंधीत कंपनी/ संस्था/ मंडळाच्या प्रमुखाचे शिफारस पत्र.

७. अर्जदाराची वार्षिक उलाढाल दर्शविणारे पुरावे. (अ,ब,क, पैंकी एक)

अ) अर्जदार आयकर भरत असल्यास त्याचा तपशील (गेल्या ३ वर्षाची विवरणपत्रे जोडावीत) किंवा गेल्या वर्षाभराचे बँकेतील जमा/खर्चाचे स्टेटमेंट *

ब) शेती असल्यास शेतीच्या उत्पन्नातून मिळालेल्या रकमेबाबत पुरावे देणारी शेती माल विक्रीची बीले.

क) नोकरी करीत असल्यास उत्पन्न दर्शविण्यासाठी १६ नंबरचा फॉर्म.

८. दोन प्रतिष्ठीत व्यक्तींची शिफारसपत्रे.

९. पुणे शहरात स्थावर मालमत्ता आहे काय ? पुणे शहरात स्थायीक होणार असल्या संबंधी विश्वासार्ह पुरावा. (प्रॉपर्टी कार्ड/वीज बील/म.न.पा. किंवा कॅन्टोनमेंटकडील मिळकतकर देयक/ ५ वर्षापेक्षा जास्त काळ एकाच ठिकाणी भाडयाने राहत असल्यास भाडे करार किंवा घर मालकाचे प्रतिज्ञापत्र) *

१०. दुसऱ्या इसमाचे शस्त्र ट्रान्सफर करुन हवे असल्यास ज्या व्यक्तीचे शस्त्र ट्रान्सफर करावयाचे आहे त्यांचेसह त्यांचे वारसांचे नोटराइजडं संमती पत्र.

११. मयत इसमाचे शस्त्र ट्रान्सफर करुन हवे असल्यास मयत इसमाच्या वारसांचे नोटराइजड संमती पत्र.

***(सदर यादीतील कोणताही एक पुरावा ग्राहय धरला जाईल)**

****(उपरोक्त अ.क्र. ११ व १२ हे फक्त शस्त्र ट्रान्सफर प्रकरणासाठी लागू राहील)**

**[टिप :- १) अ. क्र. ३, ४, ९ व १० मुळ (ओरीजिनल) कागदपत्रे जोडावीत. २) या व्यतिरिक्त आवश्यक्तेनुसार सक्षम प्राधिकारी सुचवतील ती कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. ]**